ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परिक्षणासाठी मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन शुध्दिपत्र क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, मंत्रालय,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१
तारीख: १४ मार्च, २०१६

**वाचा :**

**शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून, २०१५

**प्रस्तावना :**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. यानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे )त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे अंमलबजावणी यंत्रणांना बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणाऱ्या यंत्रणांना अदा करावयाचे शुल्क ठोक स्वरुपात ठरविण्यात आले असून हे शुल्क योजनेच्या ४ टक्के प्रशासकीय खर्चामधून अदा करावयाचे आहे. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, रुपये २.०० कोटीपर्यंतच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी अनुज्ञेय ४ टक्के प्रशासकीय खर्चापेक्षा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी अदा करावयाचे शुल्क अधिक आहे.

**शुध्दिपत्र :**

प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेवून, जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रभावी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणाऱ्या पडताळणी यंत्रणांना अदा करावयाचे शुल्क :-**

त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणाऱ्या यंत्रणांना त्यांच्या संपूर्ण कामासाठी पुढीलप्रमाणे ठोक स्वरुपात शुल्क अदा करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १) | रुपये ७.५० कोटीपर्यंतच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना | योजनेच्या ढोबळ किंमतीच्या १%. |
| २) | रुपये ७.५० कोटीहून अधिक किंमतीच्या योजना | योजनेच्या ढोबळ किंमतीच्या १% अथवा रुपये १०,००,०००/-यापैकी जे कमी असेल |

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाच्या दि.१५ जून,२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रगतीचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण किमान २ वेळा करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. (योजनेचे २० ते ३० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर व ६० ते ७० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर) तसेच अंमलबजावणी यंत्रणा यापेक्षा अधिक वेळा योजनेचे तांत्रिक परीक्षण करुन घेवू शकतात असेही सूचित करण्यात आले आहे. तथापि, शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून,२०१५ हा निर्गमित झाल्याच्या दिनांकापर्यत (दि.१५ जून,२०१५ पर्यंत) ज्या प्रगतीपथावरील योजना पुर्णत्वाला आल्या आहेत, म्हणजेच ज्या योजनांचे काम ७० टक्के पेक्षा जास्त झाले आहे, अशा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाची आवश्यकता राहणार नाही.

शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७, दिनांक १५ जून,२०१५ अन्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी निर्गमित केलेल्या अन्य मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी यापुढेही शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे सुरु राहील.

सदर शासन शुध्दिपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०३१४१२२३०१६८२८ असा आहे. हे शुध्दिपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shantaram S Kudale

Digitally signed by Shantaram S Kudale
DN: CN = Shantaram S Kudale, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Deputy Secretary
Date: 2016.03.14 13:13:56 +05'30'

**(शां.सि.कुदळे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ००३२
२. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
३. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४. मा.मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
६. सर्व सन्माननीय विधिमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई-४०० ०२१.

७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
९. विभागीय आयुक्त (सर्व),
१०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व), जिल्हा परिषद.
१२. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१३. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१६. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१७. अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१८. कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१९. मंत्रालयीन इतर सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये
२०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
२१. सर्व शासकीय आय.आय.टी.संस्था (पत्राने)
२२. सर्व शासकीय अभियांत्रिकी (पदविका/पदवी) महाविद्यालये (पत्राने)
२३. निवडनस्ती, कार्यासन पापु-०७.